॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
**North Maharashtra University, Jalgaon**
**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**
पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

‘A’ Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

**बातमी - १**

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सवानिमित्त आज शुक्रवार दिनांक १३ एप्रिल रोजी घेण्यात आलेल्या रक्तदान शिबीरात ५३ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या सहकार्याने घेण्यात आलेल्या या रक्तदान शिबीरात ५३ जणांनी रक्तदान केले. यावेळी विचारधारा प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा.अनिल डोंगरे, विभागप्रमुख प्रा.म.सु.पगारे, डॉ.सुधीर भटकर, डॉ.सोनाली कांबळे, रमेश शिंदे, इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे डॉ. प्रकाश जैन, डॉ.निता नेमाडे, रवींद्र जाधव, नरेंद्र बिऱ्हाडे, अन्वर खान राजू सोनवणे, अरूण सपकाळे, सुभाष पवार, सौ.चित्रांगा चौधरी, भिमराव तायडे, राहूल नन्नवरे आदी उपस्थित होते. विद्यापीठातील विचारधारा प्रशाळा, डॉ.आंबेडकर विचारधार विभाग, फुले-शाहू-आंबेडकर विचारमंच, विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. उद्या शनिवार दिनांक १४ एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सकाळी ७.३० वाजता विद्यापीठात मिरवणूकीचे आयोजन करण्यात आली असल्याची माहिती विचारधारा प्रशाळेच्या वतीने देण्यात आली.

--------

**बातमी - २**

जळगाव १३ (                ) महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी महासंघाच्या अध्यक्षपदी सलग चौथ्यांदा रमेश शिंदे यांची निवड होणे ही उत्तर महाराष्ट्र विद्यापीठासाठी गौरवाची बाब आहे. महासंघाच्या माध्यमातून विद्यापीठांच्या विकास प्रक्रियेत विधायक हातभार लागावा अशी अपेक्षा कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील यांनी महासंघाचे अध्यक्ष रमेश शिंदे व उत्तर महाराष्ट्र विभागाचे समन्वयक प्रमोद चव्हाण यांच्या सत्कार प्रसंगी व्यक्त केली.

महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी महासंघ हा महाराष्ट्र राज्यातील विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांचे प्रश्न मार्गी लावण्याकामी स्थापन करण्यात आला आहे. महासंघाची त्रैवार्षिक सर्वसाधारण बैठक स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी महासंघाच्या अध्यक्षपदी श्री. शिंदे यांची सलग चौथ्यांदा बिनविरोध निवड झाली याबद्दल कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील यांच्याहस्ते श्री. शिंदे व श्री. चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप रामू पाटील, कुलसचिव भ.भा.पाटील, वित्त व लेखाअधिकारी डॉ.बी.डी.कऱ्हाड, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक प्रा.ए.बी.चौधरी, जनसंपर्क अधिकारी सुनील पाटील, जी.आर.देशमुख, गोकुळ पाटील, राजू सोनवणे आदी उपस्थित होते. यावेळी श्री शिंदे म्हणाले की महासंघाच्या अध्यक्षपदी माझी निवड होणे याचा अर्थ उत्तर महाराष्ट्रातील सर्व कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष झाले असे मी मानतो. महासंघ हा कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसाठी वाटचाल करीत असताना महाराष्ट्रातील अकृषी विद्यापीठांचे प्रश्न शासन दरबारी लावून धरण्यासाठी आम्ही पाठपुरावा करू अशी ग्वाही देवून महासंघाच्या अनुकुल प्रतिकुल काळात सदैव सोबत असणारे राजू सोनवणे यांचे ऋण व्यक्त केले. तर ३० टक्के कर्मचारी कपातीच्या सध्या शासनाच्या धोरणाचा विपरित परिणाम विद्यापीठांच्या कामकाजावर होऊ शकतो यामुळे कपातीच्या धोरणाचा पुनर्विचार करण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करणे यास महासंघाचा प्राधान्यक्रम असेल असे श्री चव्हाण यांनी सांगितले.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ — दि. १३ एप्रिल, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत //--
(सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी